माहिती अधिकार


महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल :kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०३

जावक क्र. :- ५६७४ दिनांक :- 07/12/2023

अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त, कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/६७२४ दि.३०/११/२०२३

१. श्री. मनोज क्षीरसागर,
राहणार :- लोकशाहीर आण्णाभाऊ साठे,
कॉलनी नं ६, टिंबर मार्केट समोर,
दुसरा मजला, पुणे ४११ ०४२
मोबाईल नंबर ९३२५४८४८८४

२. श्री. सुनील मोरे
जन माहिती अधिकारी तथा, अधिक्षक,
कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका.

श्री. मनोज क्षीरसागर
विरूध्द
जन माहिती अधिकारी तथा, अधिक्षक ,
कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय पुणे महानगरपालिका.

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

अपिलकर्ता श्री. मनोज क्षीरसागर यांनी आ.क्र. ४८६९ दिनांक २१/९/२०२३ अन्वये कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत वर्ग १ ते ४ मध्ये नियुक्ती असलेल्या अधिकारी कर्मचारी यांच्या नियुक्तीची संपूर्ण माहिती मिळणे बावत अर्ज दाखल केला आहे

सदर अर्जात विचारले प्रमाणे माहिती जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक यांनी जा.क्र. ४३०० दि. १९/१०/२०२३ अन्वये " सदर अर्जामध्ये विचारले प्रमाणे कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे एकून ६२ पृष्ठे असून प्रती पृष्ठ २/-प्रमाणे एकून १२४/- रु रकमेचा भरणा मनपा कोषागारात करून उपलब्ध माहिती उपलब्ध करून देण्यात येतील असे कळविले.

तसेच जा.क्र. ४७७३ दि. २/११/२०२३ अन्वये जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक यांनी अर्जामध्ये विचारले प्रमाणे मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करून दिली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| २१/९/२०२३ | ३१/१०/२०२३ | १९/१०/२०२३ व दि. २/११/२०२३ | २७/१०/२०२३ | १९/१०/२०२३ |

**प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण –** जन माहिती अधिकारी यांनी १ ते ११ मुद्यामध्ये मागणी केलेल्या माहिती हि विहित मुदतीत म्हणजेच कलम ७(१) अनुसार १० दिवसांच्या कालावधी मध्ये उपलब्ध अभिलेखाबाबत व अभिलेख प्रती संख्या बाबत व येणाऱ्या खर्चाचे चलनाबाबत कळविणे बंधनकारक होते. मा. महोदय जन माहिती अधिकारी यांनी मागणी केलेल्या माहितीची उपलब्धता अभिलेखाबाबत कार्यालयीन अभिलेखांचा शोध घेतलेला नसून केवळ मोघम पद्धतीने कळवून माहिती देण्याचे टाळले आहे. जन माहिती अधिकारी यांनी मागणी केलेली माहिती बाबत कलम ७(१) अनुसार विहित मुदतीत कळविलेले नाही व सदर मुद्यांची प्रप्त असलेली माहिती त्याबाबत देखील कळविलेले नाही व मागणी केलेली माहिती हेतूपुरसर कटकारस्थान करून दडविलेली आहे आहे. जन माहिती अधिकारी यांनी संदर्भ क्र. १ अनुसार दिलेली माहिती दिशाभूल करणारी चुकीची माहिती दिलेली आहे. प्राप्त माहिती अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्राप्त माहिती भ्रमित करणारी आहे "असे नमूद केले आहे.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| ३१/११/२०२३ | ३०/११/२०२३ | होय | – | १/१२/२०२३ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि. ०७/१२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता.
सुनावणीस अपिलकर्ता :- अनुपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत वर्ग १ ते ४ मध्ये नियुक्ती असलेल्या अधिकारी कर्मचारी यांच्या नियुक्तीची संपूर्ण माहिती मिळणे बाबत अर्ज केला होता. | माहिती जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक यांनी जा.क्र. ४३०० दि. १९/१०/२०२३ अन्वये " सदर अर्जामध्ये विचारले प्रमाणे कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे एकून ६२ पृष्ठे असून प्रती पृष्ठ २/-प्रमाणे एकून १२४/- रु रकमेचा भरणा मनपा कोषागारात करून उपलब्ध माहिती उपलब्ध करून देण्यात येतील असे कळविले.<br>तसेच जा.क्र. ४७७३ दि. २/११/२०२३ अन्वये जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक यांनी अर्जामध्ये विचारले प्रमाणे मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करून दिली आहे. |

## विवेचन

अपील सुनावणी दिवशी म. जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक तसेच सहायक जन माहिती अधिकारी तथा वेतन लेखनिक उपस्थित होते परंतु अपिलार्थी हे अनुपस्थित होते.

अपील सुनावणी रोजी अर्जदार यांनी अर्जामध्ये विचारले प्रमाणे कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत वर्ग १ ते ४ मध्ये नियुक्ती असलेल्या अधिकारी कर्मचारी यांच्या नियुक्तीची संपूर्ण माहिती मिळणे बाबत केलेल्या अर्जाबाबत मा. जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक यांना केलेल्या कार्यवाहीचा तपशील विचारला असता जा.क्र. ४३०० दि. १९/१०/२०२३ अन्वये " सदर अर्जामध्ये विचारले प्रमाणे कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे एकूण ६२ पृष्ठे असून प्रती पृष्ठ २/-प्रमाणे एकून १२४/- रु रकमेचा भरणा मनपा कोषागारात करून उपलब्ध माहिती उपलब्ध करून देण्यात येतील असे कळविले.

तसेच जा.क्र. ४७७३ दि. २/११/२०२३ अन्वये जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक यांनी अर्जामध्ये विचारले प्रमाणे मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करून दिली आहे.

## -: आदेश :-

सदर सुनावणी कामी खालील आदेश पारित करणेत येत आहेत.

जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक यांनी अपिलार्थी यांचेशी संपर्क साधून अर्जात विचारलेली माहिती च्या अनुषंगाने अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती क्षेत्रीय कार्यालयाकडील उपलब्ध अभिलेखे / दस्तऐवज अपिलार्थी यांना पुढील ८ दिवसात विनामुल्य उपलब्ध करून देण्यात यावे, व त्याबाबतचा अहवाल आमचे कार्यालयाकडे सादर करावा.

वरील प्रमाणे आदेश पारित करून सदर अपिल निकाली काढण्यात येत आहे.

Dhote 3/12/23

(डॉ.ज्योती धोत्रे)

अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त

कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय

पुणे महानगरपालिका

दिनांक आणि ठिकाण: ८/११/२०२३ ,पुणे.

टीप :- १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत सुनावणी नंतर सात दिवसांच्या मुदतीत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत :-

१. श्री. मनोज क्षीरसागर,

राहणार :- लोकशाहीर आण्णाभाऊ साठे,
कॉलनी नं ६, टिंबर मार्केट समोर,
दुसरा मजला, पुणे ४११ ०४२
मोबाईल नंबर ९३२५४८४८८४

२. जन माहिती अधिकारी तथा, अधिक्षक ,
कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका.

यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.......